# संपादकीय

८ मार्च १९८१ या आंतरराष्ट्रीय स्त्री–मुक्ती दिनाच्या सुमारास बायजाचा हा अंक वाचकांच्या हातात पडेल. स्त्रियांच्या चळवळी हा दिवस साजरा करतात. कामाचे तास कमी व्हावे आणि स्त्रियांना मतदानाचे हक्क मिळावे म्हणून अमेरिकेतल्या कापड–कारखान्यातील स्त्रियांनी प्रचंड मोर्चा काढला होता. तो दिवस होता ८ मार्च १९०८. नंतर १९१४ ला ८ मार्च याच दिवशी क्लारा झेट्किन् यांच्या नेतृत्वाखाली जर्मनीच्या युद्ध-खोर धोरणाचा बायकांनी निषेध केला–तर ८ मार्च १९१७ ला रशियातील कापड कामगार स्त्रियांनी प्रचंड निदर्शने केली. रशियन क्रांतीच्या इतिहासात ह्या निदर्शनांना मोठे महत्त्व आहे.

८ मार्च हा दिवस या तेजस्वी लढ्याच्या आठवणी जाग्या करतो. स्वतःच्या हक्कांसाठी, तसेच साम्राज्य-शाही, भांडवलशाही विरोधी स्त्रिया संघटित होऊन लढू शकतात, असा आत्मविश्वास देतो.

या लढाऊ पार्श्वभूमीवर स्त्रियांनी ८ मार्च १९८१ हा दिवस साजरा करायचाय. आज देशात एका बाजूने जातीय तणाव वाढत चालले आहेत. गुजराथेतील राखीव जागांच्या विरोधी आंदोलन अद्याप धुमसते आहे. दलितांना राखीव जागा देण्याचा प्रश्न उपस्थितच कसा होतो ? समान संधीचे तत्त्व अमलात आणण्यासाठी दलितांना विशेष संधी देणे आवश्यकच आहे हे निर्वि-वाद. असे असूनही राखीव जागा हा प्रक्षोभक प्रश्न ठरतो. प्रचंड प्रमाणातल्या बेकारीचे खापर राखीव जागांवर फोडले जातंय् आणि बेकारीचं खरं कारण मात्र नजरे आड होतय. बेकारी तसेच महागाई या राहू केतूंच्या लीला आपण दररोज अनुभवत आहोत. कायदा आणि सुव्यवस्थेची हमी देत सत्तारूढ झालेल्यांच्या कारकीर्दीत कायद्याचा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय तीव्र झाला आहे. मुंबईत दाट वस्तीच्या भागात भर दिवसा आगगाडीत एका बाईचा खून होतो आणि खुनी महिना उलटला तरी बेपत्ता आहे. यांसारख्या घटना खरोखरच भयावह आहेत.

बलात्काराच्या कायद्यात महत्त्वाच्या सुधारणा कर-णारे विधेयक संसदेपुढे येण्यापूर्वी सिलेक्ट कमिटीपुढे गेले आहे. बलात्कार विषयक कायद्यात सुधारणा होण्याचे श्रेय स्त्रियांच्या चळवळीलाच द्यावे लागेल. उत्स्फूर्तपणे भारतभर झालेल्या स्त्रियांच्या जागृतीच्या आणि काही प्रमाणात झालेल्या संघटित प्रयत्नांच्या दबावाने स्त्री–विषयक कायद्यात सुधारणा होण्याची ही पहिलीच वेळ असावी.

सिलेक्ट कमिटी ही बहुपक्षीय कमिटी असते. या कमिटीकडून आवश्यक ते फेरफार होऊन बिल संसदे-पुढे येते. मूळच्या बिलात काही महत्त्वाचे फेरफार आव-श्यक वाटल्यावरून हे बिल सिलेक्ट कमिटीपुढे जावे अशी स्त्रियांची मागणी होती. ती मान्य झाल्याने बिलात योग्य असे फेरफार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सामाजिक कार्यकर्ते, स्त्री–संघटना, यांच्या सूचना सध्या सिलेक्ट कमिटी मागवीत आहे. कायद्यात सुधा-रणा झाली की प्रश्न शंभर टक्के सुटत नाही. पण स्त्रियांच्या बाजूचे कायदे किमान काही प्रमाणात स्त्रि-यांच्या फायद्याचेच ठरतात. समाज मुक्तीचे ध्येय बाळ-गणाऱ्या स्त्री–मुक्ती चळवळीने भांडवली व्यवस्थेतही शक्य तितकी स्त्रियांना अनुकूल परिस्थिती निर्माण करावी यात दुमत होण्याचे कारण नाही.

कायद्यात सुधारणा होण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्री–संघटनांनी अंमलबजावणीकडेही लक्ष पुरवायला हवे.

**– संपादक**